दि. ०१/०४/२०२५

## कारागृह शिपाई (पश्चिम विभाग) भरती -२०२२-२०२३.
## लेखी परीक्षेस पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी.

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आस्थापनेवरील पश्चिम विभागाकडील कारागृह शिपाई पदाची भरती प्रक्रियेमधील मैदानी चाचणी दि. २९/०१/२०२५ ते २६/०३/२०२५ या कालावधीत पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे पार पडली आहे. सदर मैदानी चाचणीमध्ये ५० टक्के व ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविलेल्या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार सामाजिक व समांतर आरक्षणानुसार रिक्त पदांच्या १:१० प्रमाणांत लेखी परीक्षेकरिता पात्र झालेल्या एकूण ७७११ उमेदवारांची गुणवत्ता यादी दि. २९/०३/२०२५ रोजी पुणे शहर पोलीसच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येवून गुणवत्ता यादीस अनुसरुन उमेदवारांना काही आक्षेप/हरकती असल्यास त्यांचे आक्षेप/हरकती लेखी अर्जाद्वारे estt3.pco.pune@nic.in या ई-मेलवर अथवा व्हॉट्सॲप क्रमांक ८९७५२८३१०० वर दि.३१/०३/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत मागविण्यात आले होते.

उमेदवारांनी पाठविलेल्या आक्षेपांनुसार संबंधीत उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पुनर्पडताळणी करण्यात येवून दि. ०१/०४/२०२५ रोजी लेखी परीक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची फेर अंतिम गुणवत्ता यादी खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

लेखी परीक्षा दि. ०९/०४/२०२५ रोजी पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे होणार असून परीक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी सकाळी ०५.०० वाजता परीक्षा केंद्रावर वेळेत उपस्थित राहावे. विलंबाने येणाऱ्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमाकांवर महा-आयटीद्वारे प्रवेशपत्र (HALL TICKET) पाठविण्यात येईल. उमेदवारांनी महा-आयटीकडून त्यांच्या भ्रमणध्वनीवर प्राप्त होणाऱ्या लिंकवरुन त्यांचे प्रवेशपत्र प्राप्त करुन घेवून दिलेल्या वेळेत लेखी परीक्षेस उपस्थित राहावे. उमेदवारांनी प्रवेशपत्रावरील सूचनांचे काटेकारपणे पालन करावे. प्रवेश पत्र (HALL TICKET) शिवाय लेखी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. लेखी परीक्षेच्या अनुषंगाने प्रसिध्द होणाऱ्या सूचनांकरिता उमेदवारांनी पुणे पोलीस आयुक्तालय, महा-आयटीचे संकेतस्थळ, नोंदणीकृत भ्रमणध्वनीवरील संदेश व ई-मेल नियमितपणे तपासावेत.

टिप :- जात प्रवर्गातील काही उमेदवारांची गुणवत्तेनुसार लेखी परीक्षेसाठी खुल्या प्रवर्गातून निवड करण्यात आलेली आहे. तरी उमेदवारांनी त्याबाबत खात्री करावी.

(डॉ. संदीप भाजीभाकरे)
पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय,
पुणे शहर.

पोलीस आयुक्त
पुणे शहर

E:\Police Bharti all folders\POLICE BHARTI-2023 (IMPLIMETATION-2024)\JAIL PC PB 2024---------\LETTER.docx

Scanned with CamScanner